अशोक परशुराम परब, ठाणे(पश्चिम).

□ शत्रुघ्न सिन्हाची पत्नी पूनम हिने भूमिका केलेले चित्रपट कोणकोणते?

— *आदमी और इन्सान, जिगरी दोस्त, आग और दाग* या सर्व चित्रपटात तिने कोमल या नावाने भूमिका केली हेती. १९७३च्या *सबक*मध्ये तिने पूनम या आपल्या नावाने भूमिका केली. शत्रुघ्नच या चित्रपटात तिचा नायक होता. आणि त्यानंतर शत्रूघ्न सिन्हाशी विवाह करून तिने चित्रपट संन्यास घेतला.

□ राजा नेने यांनी दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट कोणता?

— १९४२चा प्रभातचा *दहा वाजता* हा चित्रपट *दस बजे* या नावाने हिंदीतही निर्माण झाला होता आणि दोन्ही चित्रपटांचं दिग्दर्शन राजा नेने यांनी केलं होतं.

पी. एस. म्हापसेकर, म्हापसा-गोवा.

□ *कही और चल, गोल्ड मेडल, उम्मीद* या नावाचे किती चित्रपट आलेत? नायक-नायिका इतर कलाकार-संगीतकार कोण?

— *कही और चल* या नावचा एकच चित्रपट १९६८ला आला होता. नायक-नायिका देव आनंद-आशा पारेख. अन्य कलाकार सुंदर, शुभा खोटे, जगदीश राज, मदन पुरी, संगीतकार शंकर-जयकिशन. *गोल्ड मेडल* या नावचाही एकच चित्रपट १९८४ला आला होता. नायक धर्मेंद्र-जितेंद्र आणि नायिका राखी तसंच सहकलाकार शत्रुघ्न सिन्हा, बिंदू, फरियाल, डेव्हीड, के. एन. सिंग, जयश्री टी.
उम्मीद या नावचे दोन चित्रपट आलेत. १९४१ला पहिला. नायक-नायिका ईश्वरलाल-प्रभा, सहकलाकार नूरजहाँ नील, केसरी, इनायत, इब्राहिम, भगवानदास, संगीत खेमचंद प्रकाश, दुसरा *उम्मीद* १९७१ला आला होता. नायक-नायिका जॉय मुखर्जी-नंदा, सहकलाकार अशोककुमार, लीला नायडू, आगा, टुनटुन, लीला मिश्रा, संगीत रवी.

अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

□ *किस्मत* आणि *हकीकत* शीर्षकाचे किती चित्रपट आलेत? नायक-नायिका कोण?

— *किस्मत* या नावाचे सहा चित्रपट आतापर्यंत निघालेत. मूकपट जमान्यात पहिला *किस्मत* १९३२ला आला होता. नायक दास-नायिका सुनीता. बोलपटांपैकी १९४३ला पहिला. कलाकार अशोककुमार-मुमताज शांती, १९५६ला दुसरा. कलाकार रंजना-पीस कंवल, १९६८ला तिसरा. कलाकार विश्वजीत-बबीता, १९८०ला चौथा. कलाकार मिथुन चक्रवर्ती-रंजीता, १९९५ला पाचवा. कलाकार गोविंदा-ममता कुलकर्णी.

हकीकत नावाचे तीन चित्रपट आलेत. १९६४ला पहिला. नायक-नायिका धर्मेंद्र-प्रिया राजवंश, १९८५ला दुसरा नायक-नायिका जितेंद्र-जयाप्रदा, १९९५ला तिसरा. नायक-नायिका अजय देवगण-तब्बू.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ नसीरुद्दीन शहाने आतापर्यंत कोणकोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका केलीय? नायिका कोण? दिग्दर्शक कोण?

— *शायर*(नीता मेहता, दिग्दर्शक मदन बावेरिया), *सुनयना*(रामेश्वरी, दिग्दर्शक हिरेन नाग), *आक्रोश*(स्मिता पाटील, दिग्दर्शक गोविंद निहलानी), *अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यो आता है*(शबाना आझमी, दिग्दर्शक सईद अख्तर मिर्झा), *चक्र*(स्मिता पाटील, दिग्दर्शक रविंद्र धर्मराज), *सजा-ए-मौत* (राधा सलूजा, दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा), *तर्जुबा*(स्मिता पाटील, दिग्दर्शक निखिल साहनी), *आधारशीला*(अनिता कंवर, दिग्दर्शक अशोक अहुजा), *दिल आखिर दिल है*(परवीन बाबी, दिग्दर्शक इस्माईल श्रॉफ), *प्यारा दोस्त*(रंजीता, दिग्दर्शक इम्तियाज खान), *सितम*(स्मिता पाटील, दिग्दर्शक अरुणा विकास), *कथा* (दीप्ती नवल, दिग्दर्शक सई परांजपे), *मंडी*(शबाना आझमी, दिग्दर्शक श्याम बेनेगल), *मासूम*(शबाना आझमी, दिग्दर्शक शेखर कपूर), *जाने भी दो यारों* (भक्ती बर्वे, दिग्दर्शक कुंदन शहा), *मोहन जोशी हाजीर हो*(रोहिणी हट्टंगडी, दिग्दर्शक सईद अख्तर), *स्पर्श*(शबाना आझमी, दिग्दर्शक सई परांजपे), *गुलामी* (स्मिता पाटील, दिग्दर्शक जे. पी. दत्ता), *बहू की आवाज*(सुप्रिया पाठक, दिग्दर्शक शशीलाल नय्यर), *पार*(शबाना आझमी, दिग्दर्शक गौतम घोष), *सुरखियाँ*(मूनमून सेन, दिग्दर्शक अशोक त्यागी), *एक पल* (शबाना आझमी, दिग्दर्शक कल्पना लाझमी), *शर्त*(शबाना आझमी, दिग्दर्शक केतन आनंद), *जलवा*(अर्चना पुरणसिंग, दिग्दर्शक पंकज पराशर), *यह वह मंझिल तो नही*(सुस्मिता मुखर्जी, दिग्दर्शक सुधीर मिश्रा), *हीरो हीरालाल*(संजना कपूर, दिग्दर्शक केतन मेहता), *इजाजत*(रेखा, दिग्दर्शक गुलजार), *मालामाल*(पूनम, दिग्दर्शक केवल शर्मा), *पेस्तनजी*(शबाना आझमी, दिग्दर्शक विजया मेहता), *खोज*(किमी काटकर, दिग्दर्शक केशू रामसे), *त्रिदेव* (सोनम, दिग्दर्शक राजीव राय), *चोर पे मोर* (सोनम, दिग्दर्शक कपील कपूर), *एक घर* (दिप्ती नवल, दिग्दर्शक गिरीश कासारवल्ली) ,*गेम*(संगीता बिजलानी, दिग्दर्शक अनिल मट्टू) या चित्रपटात नसीरुद्दीन शाहने नायकाची भूमिका केलीय. ✶

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ *चंद्र आहे साक्षीला, स्वयंवर झाले सीतेचे, मुंबईचा जावई, धाकटी बहीण, कैवारी, लक्ष्मीची पाउले* या चित्रपटाचे नायक-नायिका, दिग्दर्शक आणि संगीतकार कोण?



मुंबईचा जावईच्या एका दृश्यात शरद तळवलकर आणि रत्नमाला

— *चंद्र आहे साक्षीला* नायक-नायिका काशिनाथ घाणेकर-कानन कौशल, दिग्दर्शक राज दत्त, संगीतकार सुधीर फडके
स्वयंवर झाले सीतेचे नायक-नायिका बालकराम-उमा, दिग्दर्शक मधुकर पाठक, संगीतकार वसंत देसाई
मुंबईचा जावई नायक-नायिका अरुण सरनाईक-सुरेखा, दिग्दर्शक राजा ठाकूर, संगीतकार सुधीर फडके
धाकटी बहीण नायक-नायिका अरुण सरनाईक-सुरेखा, दिग्दर्शक राज दत्त, संगीतकार सुधीर फडके
कैवारी नायक-नायिका विक्रम गोखले-आशा काळे, दिग्दर्शक कमलाकर तोरणे, संगीतकार प्रभाकर जोग
लक्ष्मीची पाउले नायक-नायिका रवींद्र महाजनी-रंजना, दिग्दर्शक जीजी भोसले, संगीतकार श्रीधर फडके